**Vatsalya Trust Mumbai**
**Drive with Pride**
**Impacting Lives of Aspirant**

**गीता उरणे :**



गीता उरणे राहणार इस्लामपूर, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील रहिवासी आहे. तिच्या घरी ती स्वत:, तिचे पती व तिच्या 2 मुली राहतात. गीताचे बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण झालेले होते. त्यानंतर तिने ब्युटी पार्लर चा कोर्स केला व स्वत:चे ब्युटी पार्लर चालू केले. ब्युटी पार्लर मध्ये काम करत असताना व्यवसायांतील स्पर्धा वाढत असल्याने तिला कमी कस्टमर असायचे व त्यातून तिला पुरेसा असा आर्थिक मोबदला मिळत नव्हता. त्यामुळे तिला गाडी शिकून कस्टमरला होम सर्व्हिस द्यायची होती.

गीताला प्रेरणा फाउंडेशन च्या एका कार्यकर्त्याकडून वात्यल्य ट्रस्ट मुंबई व प्रेरणा फाउंडेशन यांच्यावतीने दुचाकी व चार चाकी शिकण्याचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती मिळाली. तिने प्रेरणा फाउंडेशन शी संपर्क साधून दुचाकी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला.

दुचाकी वाहन चालवता येऊ लागल्यामुळे तिने लगेचच कस्टमरला होम सर्व्हिस देण्यास सुरुवात केली. होम सर्व्हिसमुळे कस्टमर वाढत गेले. एका कस्टमर मुळे दुसरे नवीन कस्टमर तिला मिळू लागले. त्यानंतर तिने मित्र-मंडळी, सोशल मेडिया द्वारे जाहिरात करून आजूबाजूच्या गावातही ती आता ब्युटी पार्लर चे काम कस्टमरच्या घरी जाऊन करत आहे. यातून तिचे मासिक उत्पन्न वाढले. त्यामुळे ती खूप खुश व आनंदी आहे.

वात्सल्य ट्रस्ट मुंबई आणि प्रेरणा फाउंडेशन यांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे तिला स्वतःचा आर्थिक विकास करणेस खूप मदत झाली, त्यामुळ तिने वात्सल्य ट्रस्ट मुंबई व प्रेरणा फाउंडेशन यांचे आभार मानले.

Photographs:







